| MHKO050027192023 | **म.सं.कौ.हि. का. क्र. ६४/२०२३ मधील नि.२१ खालील आदेश** | **ज्योस्ना विनोद पाटील**<br>**वि.**<br>**विनोद नरसगोंडा पाटील** |
|---|---|---|

**१.** अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण कायदा २००५ चे कलम ३१(१) प्रमाणे अर्ज दाखल केला आहे.

**२.** अर्जदाराचे असे कथन आहे की, अर्जदार यांनी वि.प.विरूध्द नि.४ अंतरिम पोटगीचा अर्ज दाखल केला होता. सदरचा अर्ज न्यायालयाने दि.१५/०३/२०२४ रोजी मंजूर केला असून सदर आदेशामुळे वि.प.चिडून अर्जदार नं.१ यांना सतत धमकी देवून त्रास देत आहेत. अर्जदार नं.२ कु. विधी ही कुसुमताई प्राथमिक विदयालय, कबनूर येथे इयत्ता ३ री मध्ये शिकत आहे. दि०५/०४/२०२४ रोजी सकाळी १०.४५ वाजणेचे सुमारास मणेरे हायस्कूलजवळ अर्जदार नं.१ व २ यांना अडवूण मारहाण करणेची धमकी देवून पोटगी देत नाही असे म्हणून अर्जदार नं.२ हिला घेवून जातो अशी दमदाटी केली. सदर गैरप्रकारामुळे अर्जदार नं.१ यांनी वि.प.नं.१ यांचेविरूध्द दि.०६/०४/२०२४ रोजी शिवाजीनगर पोलिस स्टेशन येथे एन.सी.आर. नं.२३१/२०२४ दाखल केली. वि.प.नं.१ हे स्वत:स पत्रकार म्हणवून घेतात व त्या आधारे कोणतेतरी ओळखपत्र दाखवून सर्वांना धमक्या देवून वेठीस धरतात. अर्जदार नं.१ ते ३ यांचेसाठी न्यायालयाने मंजूर केले पोटगी रक्कमेपैकी एक पै देखील देणार नाही, बघू कोण काय करतो अशी भाषा वापररून सदर वि.प. अर्जदार नं.१ ते ३ यांना सतत धमक्या देतात. वि.प. यांनी न्यायालयाने नि.४ वर दि.१५/०३/२०२४ रोजी पारित केले मनाई आदेशाचा जाणुनबुजून भंग,

अपमान केल आहे. अर्जदार नं.२ हिला वि.प.हे जबरदस्तीने घेवून जाणेच्या प्रयत्नात आहेत. अर्जदार यांचे जिवीतास वि.प.नं.१ पासून धंका आहे. सबब, न्यायालायचे नि.४ वरील आदेशाचा भंग केलेमुळे वि.प.नं.१ यांना एक वर्ष तुरूंगवासाची वा योग्य ती शिक्षा करणेबाबत विनंती केली आहे.

३. वि.प. यांनी सदर अर्जास त्यांचे म्हणणे दाखल केले आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, अर्जदार हिने वि.प. यांना त्रास देण्याचे हेतूने अनेक खोटया एन.सी. दाखल केलेल्या आहेत. त्याबाबत पोलिसांनी शहानिशा देखील केलेली नाही. वि.प. यांचेकडून रक्कम वसुल करणेसाठी व निव्वळ त्रास देणेसाठी खोटी एन.सी. दाखल करून प्रस्तुतचा खोटा अर्ज दाखल केला आहे. वि.प. याने कधीही अर्जदार हिला धमकी दिलेली नाही. तसेच कोर्टाच्या आदेशाचा भंग केलेला नाही. अर्जदार ही वि.प. यांचेबरोबर खोटया केसेस(एन.सी.) दाखल करत असून याबाबत वि.प. यांनी मा. जिल्हा पोलिस प्रमुख, कोल्हापूर यांना कळवित असून अर्जदारावर कारवाई करणेची मागणी करीत आहेत. अर्जदार हिचेवर व तिचे आईवर शिवाजीनगर पोलिस ठाणे यांचेकडे गुन्हा दाखल झाला आहे. त्या रागातून प्रस्तुतचा अर्ज दाखल केला असलेने तो नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

४. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील कागदपत्राचे अवलोकन केले. प्रस्तुतचा अर्ज हा अर्जदाराने महिला कौटुंबिक हिंसाचारा कायदा अन्वये दाखल केला आहे. अर्जदाराच्या म्हणण्यानुसार दि.१५/०३/२०२४ रोजी अंतरिम पोटगीचा अर्ज मंजूर झालेला आहे. वि.प. यांनी अर्जदार क्र.२ हिला अडवून धमकी दिली म्हणून प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. अर्जदाराने त्याबाबत पोलिस स्टेशनला प्रत दिलेली नाही. शिवाय वि.प. याने अर्जदार क्र.२ यांचा अडवूनक केली ही घटना ही दि.१२/०४/२०२४ रोजी घडलेली आहे. त्यानंतर अर्जदार व वि.प.मध्ये कोणतीही हिंसाचाराची घटना घडल्याचे

अर्जदाराने सांगितलेले नाही. शिवाय अर्जामध्ये वि.प. विरूध्द तात्पुरता मनाई आदेशही अर्जदाराच्या बाजूने नाही. त्यामुळे वि.प. यांनी आदेशाचा भंग केला म्हणून महिला कौटुंबिक हिंसाचार संरक्षण कायदा कलम ३१ प्रमाणे आदेशाचे उल्लंघन केले असे अर्जदाराचे म्हणणे नाही. त्यामुळे मला अर्जामध्ये काही तथ्य दिसून येत नाही. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आ दे श**

१. प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करणेत येतो.

Digitally signed by DATTATRAY BHAGWAN SATHE
Date: 2026.07.27 16:46:57 +0530

**दिनांक– २७/०७/२०२६** **(डी. बी. साठे)**
**इचलकरंजी.** **२ रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, इचलकरंजी, जि.कोल्हापूर**